## बलात्कारामागील संदेश



एका महाविद्यालयात मला कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात भाषण देण्यासाठी बोलावले होते. मला 'महिला आणि कायदा' या विषयावर बोलायचे होते. समोर महाविद्यालयीन विद्यार्थिनी होत्या. अपेक्षा एकच होती की, त्यांच्याशी संबंधित अशा कायद्यांची माहिती द्यावी. पण म्हणजे काय? तर विनयभंग, लैंगिक छळ, छेडछाड, अपहरण, बलात्कार याविषयी बोलावे. मी म्हणाले, 'या वयात तर कराराचा कायदा, ग्राहक कायदा, मुलभूत हक्क, कामगारविषयक कायदे या विषयांवर माहिती दिली पाहिजे.' हो, कारण या मुली वेगवेगळ्या क्षेत्रात कधी बॉस म्हणून तर कधी कामगार म्हणून काम करणार असतात हे नक्की. पण महिला किंवा मुलींशी संबंधित कायदे म्हटले की हे कायदे शिकवायचे आहेत किंवा त्यांची तोंडओळख असली पाहिजे हे कधीच मनात येत नाही. केवळ आणि केवळ छेडछाड, छळ, बलात्कार, विनयभंग असेच विषय अपेक्षित असतात. असे का होते? तर स्त्रीविषयक गुन्ह्यांना लैंगिकतेची किनार असते. केवळ स्त्रीशरीर आहे म्हणून त्याचा अपमान, त्यावर आक्रमण, त्यावर मालकी, त्यातून पराकोटीची भांडणे, हत्या, ॲसिड हल्ले असे प्रकार घडत राहतात आणि ह्या घटनांचा परिणाम त्या स्त्रीसाठी, तिच्या घरासाठी, समाजासाठी दूरगामी असतो. बलात्कार, ॲसिड फेक ह्यासारख्या घटनांमागे एक संदेश असतो, 'पुरुषांना भिऊन रहा. स्त्रियांना चिरडायला आम्हाला वेळ लागत नाही, आम्ही कुणाच्या बापाला भीत नाही. स्त्रियांना त्यांची जागा दाखवून दिलीच पाहिजे. तेव्हा स्त्रियांनो, पुरुषांच्या आज्ञेत रहा.' असा तो संदेश असतो. म्हणून मुलींना या धोक्यांची जाणिव व्हावी, स्त्री असण्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो आणि तसे झालेच तर कोणते कायदे कसे उपयोगी पडतात याची माहिती मुलींना असली पाहिजे. 'भयमुक्त, हिंसामुक्त वातावरणात जगण्याचा मानवाधिकार प्रत्येकाला मिळाला पाहिजे आणि तो जपला गेला पाहिजे' हे विधान सत्यात उतरविण्यासाठी कायदे, न्यायालये आणि पोलीसयंत्रणा यांची महत्त्वाची भूमिका असते. जर ह्या यंत्रणा आपल्या भल्यासाठी असतील तर त्यांचे अंतरंग जाणून घेतलेच पाहिजे हे आपल्याला पटते. मग जे पटले आहे, समजले, उमजले आहे ते प्राधान्याने केलेच पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत माणुसकीला काळिमा फासणारा गुन्हा म्हणून 'बलात्कार' या कृत्याकडे पाहिले जाते. या लेखमालेतून आपण बलात्काराविषयीच्या कायद्यापासून सुरुवात करू या. या लेखमालेतून बलात्काराच्या बहुचर्चित घटना, त्यासंबंधातील कायदा, तपासाची पद्धत, न्यायालयीन निवाडे या विषयावर तपशीलवार माहिती घेऊ या.

असे म्हणतात की,' स्त्रीवरील बलात्काराचा शोध हा सर्वाधिक हाहाकार माजविणारा शोध ठरला आहे आणि आजतागायत त्याचे घातक स्वरूप, त्याची दहशत संपलेली नाही. ती कायम अस्तित्वात आहे. इंग्रजीत असे म्हणतात 'All men may not be potential rapist but all Women are potential victims' म्हणजे सगळे पुरुष संभाव्य बलात्कार करणारे नसतात पण सगळ्या स्त्रिया ह्या बलात्काराच्या संभाव्य बळी असू शकतात. एखाद्या घराला, कुटुंबाला नामोहरम करायचे, बेइज्जत करायचे तर काय करायचे? तर त्या घरातील स्त्रियांची इज्जत लुटायची, बलात्कार करायचे म्हणजे आपोआप ते कुटुंब, ते घर समाजाच्या दृष्टीने कलंकित, अप्रतिष्ठित, बेइज्जत होऊन जाते. त्याची प्रतिष्ठा मातीमोल होऊन जाते. घराची, देशाची इज्जत, प्रतिष्ठा आणि योनिशुचिता यांची नाळ जोडली गेली आणि बलात्काराचे शस्त्र आणखी धारदार झाले. युद्ध, दंगलींमध्ये लाखो स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारांची तर नोंदच घेतली जात नाही. महायुद्धाच्या काळात जे बलात्कार झाले त्यांची नोंद 'नियंत्रित करता न आलेली घाणेरडी कृत्य' अशा त्रोटक शब्दात केलेली आढळते. एखाद्या देशातील नागरिकांचे, लढणाऱ्या सैनिकांचे खच्चीकरण करायचे तर भूप्रदेश ताब्यात येताच आधी तेथील बायका-मुलींवर अमानुष बलात्कार करायचे हीच मानसिकता इतिहासातील पानांवर उमटलेली दिसून येते. बलात्कार हा स्वाभाविक नाही, नैसर्गिक नाही. तो पुरुषी सत्तेचा विकृत आविष्कार आहे. एकूणच स्त्रियांच्या लैंगिक छळाच्या बाबतीत अनेक गैरसमज, अनेक गृहीतके समाजमनात आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या पुढच्या भागात.

ॲड. प्रज्ञा हेन्द्रे जोशी

अहमदनगर मो. ९८५००७५४४३